# जिल्हा परिषद जळगाव
(सामान्य प्रशासन विभाग)

Contact No.-(off.) 0257-2224255 Email-dyceogenjalgaon@gmail.com


जा.क्र.आरोग्य/आस्था-५/आरआर/ ४२७ /२०२४ दिनांक :- ०६/ ०९ /२०२४

## शुध्दीपत्र

**प्रति,**

**निवड सुची व प्रतिक्षा यादीतील**
**सर्व उमेदवार**

**विषय :-** **जिल्हा परिषद, सरळसेवा पदभरती परिक्षा - २०२३**
( आरोग्य सेविका) पदाचे कागदपत्रे पडताळणी करीता दि १३/०९/**२०२४** रोजी सकाळी ११.००वाजता उपस्थित राहण्याबाबत

**संदर्भ :-** या कार्यालयाकडून दिनांक ०६/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली जि.प. सरळसेवा पदभरती-२०२३ बाबत जिल्हा निवड समितीची तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षाधिन यादी

उपरोक्त विषयान्वये जिल्हा परिषद सरळसेवा पदभरती परीक्षा-२०२३ च्या अनुषंगाने विचाराधीन उमेदवारांची **तात्पुरती निवड यादी व प्रतिक्षाधीन यादी** जिल्हा परिषद जळगांव www.zpjalgaon.gov.in या संकेत स्थळावर दिनांक ०६/०९/२०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून उमेदवाराचे मुळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व दस्तऐवज तपासणी करीता दिनांक **१३/०९/२०२४** रोजी सकाळी **११.००** वाजता **जिल्हा परिषद, जळगांव** येथे करण्यात येणार आहे.

तरी आपण मुळ शैक्षणिक कागदपत्रे व इतर आवश्यक सर्व दस्तऐवज तसेच जाहिरातीत नमुद (अ.न.१९) प्रमाणे आवश्यक कागदपत्रे त्यांची १ प्रत सांक्षाकित सह दिनांक १३/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा परिषद,जळगांव येथे न चुकता उपस्थित रहावे. उक्त दि. १३/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता कागदपत्रे/दस्तऐवज पडताळणी करीता गैरहजर राहिल्यास गैरहजर राहणा-या उमेदवारांना निवड पक्रिये संबंधात कोणत्याही प्रकारचा दावा करता येणार नाही किंवा हक्क सांगता येणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

**जिल्हा आरोग्य अधिकारी**
**जिल्हा परिषद,जळगाव**

Scanned with CamScanner

## कागदपत्र पडताळणी वेळेस विहित कागदपत्रे / प्रमाणपत्रे सादर करणे

सदर परीक्षेच्या निकालानंतर तात्पुरत्या निवड यादीमध्ये निवड झालेल्या उमेदवारांना कागदपत्र पडताळणीसाठी आवश्यकतेनुसार खालील कागदपत्रे / प्रमाणपत्रे (लागू असलेली) सादर करणे अनिवार्य आहे.

| अ.क्र. | कागदपत्रे / प्रमाणपत्रे |
|---|---|
| १ | अर्जदाराची माहिती बरोबर असल्याचे स्वयंघोषणापत्र |
| २ | शैक्षणिक अर्हतेचा पुरावा |
| ३ | वयाचा पुरावा |
| ४ | जन्माचा पुरावा |
| ५ | आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील असल्याबाबतचा पुरावा |
| ६ | राखीव प्रवर्गातून निवड झालेल्या उमेदवारांचे संबंधित प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र |
| ७ | नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र (चालू आर्थिक वर्षातील) |
| ८ | पात्र दिव्यांग व्यक्ती असल्याचा पुरावा |
| ९ | पात्र माजी सैनिक असल्याचा पुरावा |
| १० | खेळाडूंसाठीच्या आरक्षणाकरिता पात्र असल्याचा पुरावा |
| ११ | अनाथ आरक्षणासाठी पात्र असल्याचा पुरावा |
| १२ | महाराष्ट्र राज्याचा अधिवास प्रमाणपत्र |
| १३ | महाराष्ट्र कर्नाटक सीमा भागातील महाराष्ट्र शासनाने दावा सांगीतलेल्या ८६५ गांवातील मराठी भाषिक उमेदवारांना सक्षम प्राधिकाऱ्याचा विहित नमुन्यातील दाखला |
| १४ | विवाहीत स्त्रियांच्या नावात बदल झाल्याचा पुरावा |
| १५ | मराठी भाषेचे ज्ञान असल्याचा पुरावा |
| १६ | लहान कुटूंबाचे प्रतिज्ञापन |
| १७ | पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन असल्याबाबतचे प्रमाणपत्र |
| १८ | MS-CIT अथवा समकक्ष प्रमाणपत्र |
| १९ | टंकेलेखन प्रमाणपत्र |
| २० | लघुलेखन प्रमाणपत्र |
| २१ | अनुभव प्रमाणपत्र |
| | |
| | |
| | |

जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,जळगाव

Scanned with CamScanner